# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ )

जा.क्र. ३९८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः–१०/०७/२०१६.

**१) जॉकची चोरी . :–**

दिनांक ०८/०७/२०१६ रोजी २३.३० वा. दरम्यान फिर्यादी प्रकाश भिकाजी राठोड, वय ४७ वर्ष, रा. प्रभात नगर यवतमाळ एसटी आगार तिरोडा, याची बस क्र. एमएच ४० वाय ५२७९ ही पंचर झाली. पंचर दुरुस्ती करीता जाक लावीत असतांना एक बिना नंबर क्र. ची टवेरा गाडी मधुन ४ इसम वय अंदाजे ३० वर्ष वयोगटातील हे जवळ येवुन बस जवळील जाक कि. १५,००/रु. चा जबरीने चोरुन नेला. फिर्यादी यांनी दिलेल्या तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे अप क्र. ००/१६ कलम ३९२,३४ भादंवि चे कागदपत्रावरुन पोस्टे. मोहाडी येथे प्राप्त झाल्याने पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३९२, ३४ भादंवी अन्वये नंबरी गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. चौधरी पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

**२) वाहन पलटी झाल्याने चालकाचा मृत्यु व चार जखमी. :–**

दिनांक ०९/०७/२०१६ रोजी ४.०० वा. दर. यातील आरोपी हा आपल्या ताब्यातील वाहन क्र. ३६/४३१५ मध्ये ५ प्रवासी बसवुन नागपुर वरुन बावनथळी डॅम बघण्यास सहलीकरीता जात असतांना त्याने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणाने व लाफरवाहीने चालवुन रोंघा ते लेंडेझरी मार्गावर झाडाच्या बुध्याला धडक मारुन मारोती व्हॅन पलटी झाल्याने स्वत;चे मृत्युस व ४ लोकांना जखमी करण्यास कारणीभुत झाला. असे फिर्यादी मोहम्मद आरीफ आबीद अन्सारी, वय २२ वर्ष, रा. मोमीनपुरा नागपुर यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम २७९, ३३७,३३८,३०४ (अ) भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी बावने, पो.स्टे. गोबरवाही हे करीत आहे.

४) अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी. :–

दिनांक ०९/०७/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. भंडारा, जवाहरनगर, मोहाडी तुमसर, पवनी, अडयाळ व लाखनी येथील परीसरातील अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण १० गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ७८ लिटर हातभट्टी दारू + मोसा कि. २५७३०/–रू. व ०१ लिटर ६२० मिली. देशी दारू कि. ४५०/–रू. तसेच जुगारातुन कि. ८८० रु. असा एकुण कि. २७०६०/–रू. चा माल जप्त करण्यात आला.

पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करिता.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.